Annexure – VIII

ज्ञान-विज्ञान विमुक्तये

**UNIVERSITY GRANTS COMMISSION**
**BAHADUR SHAH ZAFAR MARG**
**NEW DELHI – 110 002**

**PROFORMA FOR SUBMISSION OF INFORMATION AT THE TIME OF SENDING THE FINAL REPORT OF THE WORK DONE ON THE PROJECT**

| | | |
|---|---|---|
| 1. | NAME & ADDRESS OF THE PRINCIPAL INVESTIGATOR | Mrs. SARALA APPASAHEB ARABOLE |
| 2. | NAME & ADDRESS OF THE INSTITUTE | DR. GHALI COLLEGE, GADHINGLAJ TAL: GADHINGLAJ, DIST: KOLHAPUR. |
| 3. | UGC APPROVAL NO. AND DATE | FILE NO. 23 -1323/09 (WRO) DATE: 16/09/2009 |
| 4. | DATE OF IMPLEMENTATION | 03/10/2009 |
| 5. | TENURE OF THE PROJECT | 03/10/2009 To 03/10/2012 |
| 6. | TOTAL GRANT ALLOCATED | RS.75,000/- |
| 7. | TOTAL GRANT RECEIVED | RS.71,500/- |
| 8. | FINAL EXPENDITURE | 77,916/ |
| 9. | TITLE OF THE PROJECT | **GADHINGLAJ TALUKYATIL DARU-BANDI CHALAVAL : EK SAMAJSHASTRIYA ABHYAS (*ANTI-LIQUOR MOVEMENT IN GADHINGLAJ TALUKA: A SOCIOLOGICAL STUDY.*** |

**10. OBJECTIVES OF THE PROJECT:**

संषोधनाची (अभ्यासाची) उद्दिश्टये –:

7. गडहिंग्लज तालुक्यातील दारूबंदी चळवळ झालेल्या गावचा अभ्यास करणे.
8. दारूबंदी चळवळ करताना येणाऱ्या अडचणींचा उहापोह करणे.
9. दारूबंदी चळवळीमधील स्त्रियांचा सहभाग व महत्व यांचा अभ्यास करणे.
10. दारूबंदी चळवळीमुळे गावात झालेल्या सामाजिक व आर्थिक परिवर्तनाचा आढावा घेणे.
11. दारूबंदी नंतर स्त्रियांच्या समोर येणाऱ्या अडचणींचा अभ्यास करणे.
12. षासनाच्या दारूबंदी चळवळी विशयक दृश्टिकोनाचा अभ्यास करणे.

**11. WHETHER OBJECTIVES WERE ACHIEVED (GIVE DETAILS): Yes**

सदर लघुसंशोधनामध्ये खालील उद्दिष्टांचा अभ्यास केला आहे.

**गडहिंग्लज तालुक्यातील दारूबंदी चळवळ झालेल्या गावचा अभ्यास करणे.**

अभ्यासाच्या कालावधीत गडहिंग्लज तालुक्यातील दारूबंदी झालेल्या 15 गावापैकी 11 गावांनी भेटी देवून दारूबंदी चळवळीविषयी माहिती संकलन केले. या संकलनातून हाती आलेल्या सामग्रीच्या आधारे विश्लेषण करून या लघूसंशोधन प्रकल्पाची पाच प्रकरणामध्ये विभागणी करण्यात आली. संकलन करत असताना या संकलनाबरोबरच या गावातील सामाजिक–आर्थिक जीवन समजून घेतले. दारूबंदी चळवळीसाठी अवलंबण्यात आलेल्या मार्गाचा आढावा घेतला. दारूबंदीसाठी मतदान पध्दती प्रक्रिया कशी अवलंबली गेली याचीही माहिती घेतली. एकुण चळवळ सुरू केल्यापसून ते दारूबंदी चळवळ यशस्वी होण्यास लागलेल्या कालावधीचा आढावा घेतला.

**दारूबंदी चळवळ करताना येणाऱ्या अडचणींचा उहापोह करणे.**

गावच्या विकासाच्या वाटचालीत व्यसनाधिनतेचा मोठा अडसर निर्माण होत होता. म्हणून सर्व स्त्रिया संघटीत होवून गावातून दारूचे दुकान हद्दपार करण्यासाठी लढा सुरू केला. सुरूवातीस सभा, प्रबोधन फेरी, व्याख्याने आयोजित केली. स्त्रिया एकत्र येवून चळवळ हाती घेताना अनेक अडचणींना सामोरे जावे लागले. गावातील व्यसनी लोक विरोध करून लागले. काही व्यसनी पुरूषांच्या घरातील महिलांनी चळवळीत सहभागी झाल्यामूळे त्यांना घरातून बाहेर काढले. गावातील काही लोक महिलांच्यावर टिका करू लागले.दारू दुकान मालकांनी तर चळवळ अयशस्वी होण्यासाठी अनेक युक्त्या वाढवल्या. दारूबंदीसाठी जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन दिल्यानंतर मतदानाची तारीख प्रशासनाकडून लवकर मिळत नव्हती. त्यासाठी बऱ्याच वेळा जिल्हाधिकाऱ्यांच्याकडे महिलांना जावे लागले. गावातील काही राजकीय पुढाऱ्याकडूनही काही गावात बराच विरोध स्त्रियांना सोसावा

लागला. काही महिलांचे मतदान कार्डच जप्त करण्यात आहे. घरसंसार सांभाळून हा लढा लढण्यासाठी प्रत्येक गावातील महिलांना कमीतकमी चार ते सहा महिने त्रास सहन करावा लागला. दारूबंदी चळवळ राबविताना महिलांना अनेक कडचणींना तोंडा देत चळवळ यशस्वी करून दाखविणे हे त्यांच्यासमोरील एक आव्हानच होते.

**दारूबंदी चळवळीतील स्त्रियांचा सहभाग व महत्व यांचा अभ्यास करणे.**

गावातील किमान 50 टक्के महिलांनी एकत्र येवून ग्रामसभेत दारूबंदी साठी ठराव मांडला तर दारूबंदी करता येते या शासन नियमाचा आधार घेवून गावातील जवळजवळ 80 ते 90 टक्के स्त्रिया एकत्र येवून दारूबंदी लढा यशस्वी करण्याचे प्रयत्न केले. यामध्ये प्रामुख्याने गावातील सर्व स्त्रिया अत्यंत हिरीरीने पुढाकार घेतल्या. ग्रामसभेत ठराव मांडण्यासाठी सर्व स्त्रिया उपस्थित राहिल्या. ग्रामसभेत दारूबंदीसाठी ठराव संमत झाल्यानंतर महिलांनी पुढाकार घेवून प्रबोधन फेरी, व्याख्यान, चर्चा या मार्गाचा अवलंब केला. स्त्रियांनी हा लढा यशस्वी करण्यासाठी आटोकाट प्रयत्न केले. दारूबंदी झालेल्या 11 गावापैकी 9 गावात मतदान पध्दती अवलंबली. तर एका गावात हात उंचावून आडव्या वाटलीसाठी 90 टक्के मतदान व एका गावात दारू दुकान मालक स्वत:च दारू दुकान बंद करण्याचा निर्णय घेतला. 9 गावात मतदान पध्दतीचा अवलंब केला त्या गावात स्त्रियांनी पुढाकार घेवून घरोघरी जावून आडव्या बाटली मतदानासाठी प्रबोधन केले. वेळोवेळी सभा आयोजित केले. मतदानादिवशी महिलांनी अत्यंत कष्ट घेवून जास्तीतजास्त मतदान होण्यासाठी अटोकाट प्रयत्न केले. स्त्रियांच्या या एकगीत सहभागामुळे दारूबंदी चळवळ यशस्वी होण्यास मदत झाली. त्यामुळे या चळवळीत स्त्रियांचे महत्व व त्यांनी घेतलेले कष्ट फार मोलाचे आहेत.

**दारूबंदी चळवळीमुळे गावात झालेल्या आर्थिक व सामाजिक परिवर्तनाचा आढावा घेणे.**

दारूबंदी चळवळीतून गावातील लोकामध्ये अनेक सामाजिक जाणीवा निर्माण झालेल्या दिसतात. उदा – गावातील एकीची वृध्दी, महिलाचा सार्वजनिक उपक्रमातील वाढता सहभाग, तरूणांच्या विधायक दृष्टीकोनात व कार्यात झालेली वाढ, सामाजिक उपक्रमात जातीय, धार्मिक भेदभावाची कमी होत असलेली तीव्रता, सामुदायिक उपक्रमाच्या माध्यमाने गावच्या विकासासाठी उत्स्फुर्तपणे एकत्र येणाच्या मानसिकतेत झालेली वाढ, स्त्रि:याची सघटीत शक्ती, उत्तम आरोग्याची जाणीव या नव्याने विकसीत झालेल्या जाणीवा व यामुळे गावात एक विधयक सामाजिक परिवर्तन घडून आले. गावात व्यसनाच्या आहारी गेलेली काही उद्‌वस्त कुटूंबे सावरली गेली. या चळवळीमुळे गावचा व कुटूंबाचा आर्थिक विकास व परिवर्तन होण्यास मदत झाली.

**शासनाच्या दारूबंदी चळवळ विषयात दृष्टीकोनाचा अभ्यास करणे.**

महाराष्ट्र शासन दारूबंदी अधिनियमानुसार दारूबंदी चळवळ स्त्रियांनी एकत्र येवून करू लागल्या. पंरतू शासनाच्या म्हणावा तसा प्रतिसाद या चळवळीला मिळत नसल्याचे दिसून आले. दारूबंदीसाठी जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन दिल्यानंतर लगेच दारूबंदीसाठी मतदानाची तारीख मिळत नव्हती. त्यासाठी वेळोवेळी पाठपुरवा करावा लागत होता. शासनाने केवळ दारू विकीतून मिळणाऱ्या सेल्स टॅक्सचा विचार न करता लोकांच्या आरोग्याचा,

त्यांच्या कुटूंबाचा व पर्यायाने राष्ट्राचा विचार करून दारूबंदी झालेल्या गावांना विविध योजना, पुरस्कार, बक्षीस स्वरूपात मतद करावी. अशी अपेक्षा आहे.

अवैध धंदे आटोक्यात आणण्यासाठी तालुकास्तरावर तहसीलदारांच्या अध्यक्षतेखाली दक्षता समितीची स्थापना करावी, असा शासनाचा आदेश आहे. बहुतांश तालुक्यात अशा समित्याच नाहीत. प्रत्येक तालुक्यात अशा समित्या स्थापन करणे गरजेचे आहे. दारूबंदी चळवळीसाठी शासनाचा म्हणावा तसा विधायक दृष्टीकोन असलेला दिसून येत नाही.

**12. ACHIEVEMENTS FROM THE PROJECT:**

या लघु संशोधन प्रकल्याव्दारे खालील बाबी साध्य होण्यास मदत झाली.

1. गडहिंग्लज तालुक्यातील दारूबंदी चळवळीचा अभ्यास करण्यात मदत झाली.
2. दारूबदी चळवळ करताना महिलांच्या समोर येणाऱ्या अडचणी समजून घेण्यात आले.
3. दारूबंदी चळवळीमधील स्त्रियांचा सहभाग व महत्व याचा वेध घेता आला.
4. दारूबंदी चळवळीमुळे गावात झालेल्या सामाजिक व आर्थिक परिवर्तनाचा आढावा घेता आला.
5. दारूबंदीनंतर स्त्रियांच्या समोर येणाऱ्या अडचणी समजून घेण्यात आले.
6. शासनाच्या दारूबंदी विषयक दृष्टीकोनाचा आढावा घेता आला.
7. मतदान पध्दती प्रकिया समजून घेण्यात आली.
8. दारूबंदी चळवळीसाठी लागलेला कालावधीचा आढावा घेता आला.
9. विविध स्तरातील लोकांचे मिळालेले सहकार्य समजून घेण्यात आले.
10. पुढच्या अभ्यासकांना ही माहिती उपलब्ध करून देता आली.
11. दारूबंदी चळवळीमुळे गावात एक विधायक परिवर्तन घडून आले. लोकांच्यात व्यसनविरोधी जागृती निर्माण झाली.
12. व्यसनाच्या आहारी गेलेल्या कुटूंबाची सामाजिक, आर्थिक प्रगती साधण्याचे उद्‌दिष्ट साध्य झाले.

**13. SUMMARY OF THE FINDINGS (IN 500 WORDS):**

लघुसंषोधनसाठी संषाधकाने ''गडहिंग्लज तालुक्यातील दारूबंदी चळवळ : एक समाजषास्त्रीय अभ्यास.'' या लघुषोधनिबंधाचे संषोधन केले. त्यासाठी गावातील दारूबंदी संघर्श कृतीसमितीच्या अध्यक्षा, महिला कार्यकर्त्या, सरपंच, तरूण मंडळे, कार्यकमात सहभागी असणाऱ्या तज्ञ व्यक्ती व अधिकारी यांच्या मुलाखती घेऊन मिळालेली माहिती, व षासकीय कागदपत्रे उदा. महाराश्ट्र षासन दारूबंदी अधिनियम, मतदान पद्धती इत्यादींचा अभ्यास करून प्रत्यक्ष भेटीतून, चर्चेतून, ग्रामपंचायतीतील

नोंदी व षासन परीपत्रके इत्यादीच्या आधारे मिळालेल्या माहितीनुसार केलेल्या वर्गीकरणातून व विष्लेशणातून संषोधकाने निश्कर्श व सूचना नमूद केले आहेत. अर्थात हे निश्कर्श सत्य वस्तूस्थितीवर आधारित असून ते खालील प्रमाणे आहेत.

1) दारूबंदी चळवळीमूळे स्त्रियांच्यात एकता निर्माण होवून स्त्रिया व्यसनविरोधी लढा देण्यास समर्थ बनल्या.

2) दारूबंदी चळवळ हे महिलांच्या संघटित ताकदीचेचयष आहे. महिला काय करू षकतात, हे या चळवळीने सिद्ध झाले.

3) या चळीवळीमूळे लोकांच्यात व्यसनविरोधी जागृती निर्माण झाली.

4) दारूबंदी चळवळीसाठी स्त्रियांना अनेक अडचणींना तोंड देत संघर्शमय वाटचाल करावी लागली.

5) या चळवळीमूळे व्यसनाच्या आहारी गेलेली अनेक उद्ध्वस्त कुटुंबे सावरली गेली.

6) दारूबदी चळवळीसाठी ग्रामपंचायत सरपंच, उपसरपंच, सदस्य, ग्रामसेवक यानी चांगले सहकार्य केले.

7) गावातील सर्व महिला, पुरूश, तरूणमंडळे, सामाजिक कार्यकर्ते, राजकीय व्यक्ती यांचे मार्गदर्षन व पाठिंबा मिळाल्यामुळे महिला हा लढा समर्थपणे लढण्यास सज्ज झाल्या.

8) ग्रामसभेमध्ये महिलांनी दारूबंदीसाठी एकमताने ठराव मांडला.

9) दारूबंदी चळवळीसाठी गावात दारूबंदी संघर्श कृती समिती स्थापन करून या समितीच्या अध्यक्षस्थानी महिलांची निवड करण्यात आली.

10) दारूदबंरीसाठी गावात सर्व महिलानी एकत्र येऊन गावात प्रबोधन फेरी, व्याख्याने, तसेच घरोघरी जाऊन चळवळीसाठी माहिती दिली.

11) गावातील जवळ जवळ 90: महिलांनी या चळवळीत भाग घेतला होत्या.

12) गावातील व्यसनी कुंटुबातील व्यसनी पुरूशांचा व इतर 5 ते 10: लोकांचा विरोध होता.

13) संषोधनासाठी निवडलेल्या काही गावात 30 ते 35 वर्शापासून षासनमान्य दारू दुकान सुरू होते. तर कांही गावात 20 ते 25 वर्शापासून षासनमान्य दारू दुकान होते.

14) दारूबंदी चळवळीसाठी 9 गावातील दारू दुकान मालकांचा पूर्ण विरोध होता. त्यामूळे त्यांनी ही चळवळ यषस्वी न होण्यासाठी अनेक युक्त्या लढवल्या. तर

दोन गावामध्ये चळवळ सुरू झाल्यानंतर दारू दुकान मालकांनी स्वतःच सामोपचाराने दुकान बंद करण्याचा निर्णय घेतला. काही दारू दुकान मालकांनी व्यसनी पुरूशांच्या घरातील महिलांचे मतदानपत्र त्यांच्याकडून काढून घेतले. तर काहीना पैसे देऊन उभ्या बाटलीसाठी मतदान करण्यास प्रवृत्त केले.

15) दारू विक्रीबंदीसाठी जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन दिल्यानंतर प्रत्येक गावाला जवळ जवळ 2 ते 3 महिन्यांनी गुप्त मतदानासाठी मतदान घेण्याची तारीख मिळाली.

16) 11 गावापैकी 9 गावामध्ये गुप्त मतदान पद्धती अवलंबली. तर तेरणी गावात मतदान न घेता 90: महिलांनी हात उंचावून दारूबंदीसाठी विरोध दर्षविला. अरळगुंडी गावात दारू दुकान मालक व गावातील प्रमुख महिला कार्यकर्त्या, सरपंच यांच्यात सामोपचाराने दारू दुकान मालकाने स्वतः दुकान बंद करण्याचा निर्णय घेतला.

17) 9 गावामध्ये गुप्त मतदान पद्धतीने मतदान झाले व प्रत्येक गावामध्ये 80 ते 90 टक्के मतदान झाले. यापैकी 85 ते 90: मतदान आडव्या बाटलीला झाल्यामुळे पहिल्याच टप्यात दारूबंदी चळवळीला यष प्राप्त झाले.

18) दारूबंदी चळवळीला यष प्राप्त झाल्यानंतर महिलांनी गावात अवैधरित्या जी दारूविकी काही गावात होत होती. त्यासाठीही विरोध केला.

19) दारूबंदी चळवळीमूळे व्यसनाधिनतेकडे वळणाऱ्या पुरुशांचे, तरूणांचे संरक्षण झाले. एक निरोगी व सक्षम पिढी निर्माण करणे दारूबंदी चळवळीमुळे षक्य झाले.

20) दारूविक्री बंदी आंदोलनाचे एक वैषिश्टय म्हणजे या आंदालनाने परिसरातील इतर गावातील स्त्रियांनाही दारूविक्रीबदीसाठी मोठया प्रमाणात प्रेरणा दिली.

21) पूर्वी गावात तळीरामांचे थवे रस्त्यावर दिसत होते. महिलांना रस्त्यावरून जाण्यासाठी फार अडचण होत होती. आता पूर्णपणे चित्र बदलले आहे. एकही तळीराम आता दिसत नाही. महिलांना अगदी मोकळा ष्वास मिळत आहे.

22) महाराश्ट्रातील कोल्हापूर जिल्हयातील गडहिंग्लज तालुक्यात गुप्त मतदानाद्वारे 9 दुकानामधून दारूविकी बंद होणारी कदाचित ही पहिलीच घटना असेल.

23) या चळवळीतून गावातील लोकांचे अनेक सामाजिक जाणीवा निर्माण झालेल्या दिसतात. उदा. गावातील एकीची वृद्धी, महिलांचा सार्वजनिक उपक्रमातील वाढता सहभाग, तरुणाच्या विधायक दृश्टीकोनात व कार्यात झालेली वाढ, सामाजिक उपक्रमात जातीय, धार्मिक भेदभावाची कमी होत असलेली तीव्रता, सामुदायिक उपक्रमाच्या माध्यमाने गावच्या विकासासाठी उस्फुर्तपणे एकत्र येण्याच्या मानसिकतेत झालेली वाढ, स्त्रियांची संघटित षक्ती, उत्तम आरोग्याची जाणीव या नव्याने विकसीत झालेल्या जाणीवा खेडयाच्या विकसासाठी उपयुक्त ठरताना दिसून येतात.

**14. CONTRIBUTION TO THE SOCIETY (GIVE DETAILS):**

सदर लघुसंशोधनाचे समाजासाठी योगदान हे अत्यंत महत्वपुर्ण आहे. कारण समाजामध्ये आज व्यसनाधिनतेचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहे. ग्रामीण भागत तर व्यसनाच्या आहारी गेलेली अनेक कुटूंबे उद्‌ध्वस्त होत आहेत. व्यसन लोकांच्या मानसिक व शारीरिक आरोग्यावर विपरीत परिणाम झालेला दिसून येतो. त्यामुळे समाजामध्ये दारूबंदी चळवळ ही एक विधायक परिवर्तन घडवून आणणारी चळवळ म्हणून ओळखली जाते. गडहिंग्लज तालुक्यात 90 खेडी आहेत. जवळ – जवळ सर्वच खेडयात सरकारमान्य देशी दारू दुकान आहेत. गेल्या 5 ते 6 वर्षापासून गडहिंग्लज तालुक्यात महिलांच्या पुढाकाराने दारूबंदी चळवळ यशस्वी होत असताना दिसून येते.

संशोधकाने गडहिंग्लज तालुक्यातील दारुंबंदी झालेल्या 11 गावांचा सविस्तर अभ्यास केला. दारूबंदी झालेल्या या गावांचा आदर्श घेवून इतरही गावांनी दारूबंदी चळवळ यशस्वी करण्यात पुढाकार घेत आहेत. दारूबंदीमुळे गाव व्यसनमुक्त होवून गावचा व कुटूंबाचा विकास होण्यास मदत झाली आहे. व्यसनाच्या आहारी गेलेली कुटूंबे आता व्यसनापासून मुक्त झाली आहेत. त्यामुळे त्या कुटूंबातील महिलांना आता दिलासा मिळाला आहे. दारूबंदी झालेली 11 गावे आज तालुक्यात आदर्श गावे म्हणून ओळखली जात आहे. इतर गावांनी या गावांकडे सकारात्मक दृष्टीकोनातून पाहात आहेत.

संशोधकाने केलेल्या संशोधनाचा आणि संशोधन अहवालाचा वापर हा समाजातील वाचक विद्यार्थी, नवीन, संशोधक, संशोधन करू इच्छिणारे अभ्यासक, डॉक्टर, समुपदेशक दारूबंदी कृती समितीचे अध्यक्ष कार्यकर्ते, व्यसनमुक्ती केंद्रे, समाजशास्त्राचे अभ्यासक, व्यसनी कुटूंबाला, सामाजिक संस्था संघटना, महिला दक्षता कृती समिती, महिला मंडळ, सामाजिक कार्यकर्ते इत्यादीना हा संशोधन अहवाल अतिशय मार्गदर्शक ठरेल. सदर संशोधनामुळे व्यसनाच्या आहारी गेलेल्या लोकांचे ताण – तणाव, चिंता, काळजी, वैफल्य दूर करण्यासाठी त्यांचा आत्मविश्वास वाढविण्यासाठी व जीवनाकडे पाहण्याचा सकारात्मक दृष्टीकोन जीवन निरोगी बनविणे व उत्तम

कौटूंबिक जीवन जगणे व सामाजामध्ये एक आदर्श नागरीक म्हणून जीवन व्यतीत करणे यासाठी अशा प्रकारचे संशोधन होणे आज काळाजी गरज आहे.

**15. WHETHER ANY PH.D. ENROLLED/PRODUCED OUT OF THE PROJECT** : No.

**16. NO. OF PUBLICATIONS OUT OF THE PROJECT** : No

**(PRINCIPAL INVESTIGATOR)**

**(PRINCIPAL)**

I/C Principal
Dr.Ghali College
Gadhinglaj,Dist.Kolhapur